**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक - ०२/०३/२०२३

**दि.०१/०३/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी २५३/२०२३भा.द.वि.कलम ३०७,४५२,५०४,५०६, महा. पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/०२/२०२३ रोजी १७/३० वा. चे सुमा.हनुमान मंदिराजवळ, जुना बाथरूमच्या पाठीमागे, गांधीनगर, नागराज भांडेकर यांची खोली, पिंपरी, पुणे. फिर्यादीचे राहते घर. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/०३/२०२३ रोजी००/२१ वा. |
| फिर्यादी | :- | श्री. महादेव मरिप्पा म्हेत्रे, वय ४२ वर्षे, धंदा बिगारी काम, रा. हनुमान मंदिराजवळ, जुना बाथरूमच्या पाठीमागे, गांधीनगर, नागराज भांडेकर यांची खोली, पिंपरी, पुणे. |
| आरोपी | :- | आक्का ऊर्फ राकेश काळूराम गोरखा वय अंदाजे २७ वर्षे, रा. गांधीनगर, पिंपरी, पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी हा गणेश भांडेकर यांच्या खोलीकरीता पुरूष भाडेकरू आणला असता फिर्यादीने त्यास पुरूष भाडेकरू करीता विरोध केला असता त्याचा राग येवून आरोपी ने फिर्यादीला शिवीगाळ करून आता तुला फाडतो अशी धमकी देवून निघून गेला.नंतर १७.३० वा. चे सुमारास फिर्यादीहे एकटा राहते घरी पलंगावर आरम करीता टिव्ही बघत पडले असतांना नमुद आरोपी याने नमुद कारणावरून चिडून जावून फिर्यादीचे घरात घुसून तुला आता खल्लास करतो असे म्हणून फिर्यादीला जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या हातातील चाकू फिर्यादीचे छातीच्या खाली पोटारवर जोरात वार करून फिर्यादीला गंभीर जखमी करून पळून गेला आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि चाटे ९९६०९२४८५६ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ७३/२०२३ भा.दं.वि.कलम ३९४,३२३, ५०४,४२७,१०९,३४ मपोका कलम ३७(१)(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२८/०२/२०२३ रोजी १८.१५ वा चे सुमारास वंडरकार शोरुमच्या पाठीमागील चौकामध्ये, एमआयडीसी भोसरी, पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि०१/०३/२०२३ रोजी ००.५४ वा |
| फिर्यादी | :- | संदिप दत्तात्रय मुळुक, वय ४६ वर्षे, धंदा व्यवसाय रा. डी-१, अल्कॉन स्क्वेअर, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे. |
| आरोपी | :- | १) विकास मामनचंद गोयल वय ४० वर्षे रा ए-८०४, आठवा मजला, पार्क टिटॅनियम, सनं-२१०, पार्क स्ट्रीट रोड, वाकड, पुणे, २) इमरान महेबुब अत्तार वय ३७ वर्षे रा फ्लॅट नं-०४, महेश हौसिंग सोसायटी, संभाजीनगर, चिंचवड, पुणे व त्यांच्यासोबतचे दोन अनोळखी इसम<br>**आरोपी क्र १ व २ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी फिर्यादीस भेटण्यासाठी बोलावुन फिर्यादी त्याठिकाणी गेले असता सकाळी गाडीला कट मारण्याचे कारणावरुन आरोपीत यांनी फिर्यादीस लाकडी दांडक्याने मारहाण करुन या मादरचोतला मारुन टाका याला खल्लास करा असे ओरडुन सांगितले असता त्या २ अनोळखी लोकांनी हाताने व लाथाबुक्क्यांनी फिर्यादीस मारहाण करुन फिर्यादीच्या गळयातील ३,७५,०००/- किंमतीचे सोन्याची चैन व हातामधील सोन्याचे ब्रेसलेट असा ७.५ तोळयाचे दागीने जबरदस्तीने काढुन घेवुन चोरुन नेले आहे तसेच सदर झालेले भांडणामध्ये फिर्यादी यांचा ॲपल कंपनीचा आयफोन गहाळ झाला असुन फिर्यादीचे मित्र व कामगार फिर्यादीला घेवुन जाणेसाठी सदर ठिकाणी आले असता त्यांनाही आरोपी यांनी मारहाण करुन आरोपी यांनी |

फिर्यादीचे कामगार यांची वेर्णा गाडीस धडक देवुन सदरची गाडी क्रेनवर धडकुन गाडीचे नुकसान केले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि चव्हाण ९५५२५२६६३५

३.

पोस्टे व गु.रजि.नं. :- निगडी १२७ /२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२८/०२/२०२३ रोजी १८/१५ वा सुमा अप्पुघर चौकाकडुन भक्ती शक्ती चौकाकडे येणा-या रोडवर ट्रांन्सपोर्टनगर निगडी पुणे.

गुन्हा दाखल :- दि.०१/०३/२०२३ रोजी १९/२३ वाजता

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- दोन अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांचे पतीसह पायी इव्हिनींग वॉककरीता जात असताना दोन अज्ञात इसमांनी आपसात संगणमत करुन फिर्यादीचे गळयातील ८०,०००/- रुपये किंमतीचे दोन तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र पाठीमागुन पायी येवुन हिसका मारुन चोरी करुन समोर थांबलेल्या मोटर सायकल वर पळुन गेला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि धुमाळ ८५३०८६६३३३

४.

पोस्टे व गु.रजि.नं. :- सांगवी ८०/२०२३ भा.द.वी कलम ३७६(२)(एन),४२०,४०६ माहीती तंत्रज्ञान का क ६६ (डी )

गु.घ.ता.वेळ व ठि. :- सप्टेंबर २०२१ पासुन ते दि. १५/१२/२०२२ रोजी दरम्यान हींजवडी फेज वन मधील ओयो हॉटेल,विशालनगर साई इन ओयो लॉज,ब्लु माय स्टिक लॉज हिंजवडी फेज वन

गुन्हा दाखल :- दि.०१/०३/२०२३ रोजी१९/४२ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- अमोल अशोकराव पिंपळे ( देशमुख ) वय ३३ वर्षे धंदा व्यवसाय सध्या रा धानोरी विश्रांतवाडी पुणे अचुक पत्ता माहीत नाही मुळ गाव मुपो पळसखेडा (पिंपळे) ता. भोकरदन जिल्हा जालना

**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिाकणी नमुद अरोपी याने शादी डॉट कॉम या साईट वरुन फियादी यांचेशी लग्नासाठी संपर्ककरुन फिर्यादीस लग्न करण्याचे आमिष दाखवुन वारंवार व्यवसायामध्ये वैयक्तीक काही अडचनी आल्याचे दाखवुन फिर्यादी यांचेकडील त्यांनी बचत केलेले पैसे ॲप द्वारे लोन कसे घ्यायचे याची माहीती आरोपीने घेवुन फिर्यादी यांन सांगुन फिर्यादी यांना वेगवेगळया ॲप वरुन लोन घेण्यास भाग पाडुन मिळालेले पैसे त्यांचे मित्राचे खात्यावर फोन पे व गुगल पे ट्रान्फर करुन घेतले तसेच काही रक्कम रोख स्वरुपात घेवुन विश्वास घात करुन आर्थिक फसवणुक केली तसचे आरोपीने वारंवार फिर्यादीस भेटण्यास येवुन हिंजवडी पिपळे निलख येथिल लॉजवर घेवुन जावुन लग्नाचे आमीष दाखवुन फिर्यादीचे इच्छेविरुध्द संमतीविना शाररिक संबध प्रस्थापित करुन संभोग करुन बलात्कार करुन फिर्यादी यांची साधारण १९,००,०००/- रु ची आर्थीक फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि गुन्हे तांबे साो ९८२३०७९८५२

५.

पोस्टे व गु.रजि.नं. :- भोसरी १९३/२०२३ भा.दं.वि. क. ३७६,३७६(२)(एन),५०६

गु.घ.ता.वेळ व ठि. :- जानेवारी २०२० पासून ते आज रोजी पर्यंत रुम क्रमांक ३८,गुरुकुलकॉलनी,गवळी बिल्डिंग,चक्रपाणी वसाहत भोसरी

गुन्हा दाखल :- दि.०१.०३.२०२३ रोजी २०.४८ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- प्रविण अरुण चौधरी वय- ३३ वर्ष रा.हनुमान कॉलनी, सावंतनगर, दिघी,पुणे.**(मुळ रा.बिहार)**
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी जानेवारी २०२० पासून ते आज रोजी पर्यंत नमुद आरोपी याने फिर्यादीचे ईच्छेविरुध्द शारिरीक संबंध ठेवले तसेच त्याचे पासून गर्भधारणा होण्यास आणि तो गर्भ खाली करण्यास धमकावून भाग पाडले म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि केंद्रे ९६८९००३५१७

६.

पोस्टे व गु.रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ६०/२०२३ भा.द.वि.क. १४३, १४७, १४९, ४२७, ५०४, ५०६, ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २८/०२/२०२३ रोजी दुपारी १६.५४ वा. चे सुमा.मौजे भांबोली गावचे हद्दीत, जमिन गट नं. १९२ मध्ये ता.खेड जि.पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.०१/०३/२०२३ रोजी ०२/१७ वा.

फिर्यादी :- सचिन संतराम नाईकनवरे वय ३७ वर्ष, धंदा - शेती, रा. वराळे, राजहंस निवास, हनुमान मंदीर शेजारी, ता. खेड जि.पुणे

आरोपी :- १) संजय कचरु नवरे, २) अनिल कचरु नवरे, ३) सुनिल कचरु नवरे,
४) गणेश मनोहर भोंडवे ५) अक्षय संजय नवरे ६) महिला आरोपी
७) महिला आरोपी ८) ओंकार अनिल नवरे ९) महिला आरोपी
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचे कामगार हे तारेचे कंपाउंडचे आत काम करत असताना नमुद आरोपी यांनी अनाधिकाराने फिर्यादीचे ताब्यात व फिर्यादीकडे कुलमुखत्यार असलेले जागेचे आत दगड व लाकडी दांडके घेवुन येवुन नमुद आरोपीनी फिर्यादीने केलेले तार कंपाउंन्डचे आत येवुन हाताने व पायाने कंपाउंड तोडुन नुकसान करुन फिर्यादीला व सोबत असलेले पांडुरंग ज्ञानदेव खताळ यांना शिवीगाळ करुन आताच्या आता पाच लाख रुपये दया नाहीतर तुमच्या जिवाचे आम्ही बरेवाईट करु अशी धमकी देवु लागले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउपनि भंडरवाड ९५४५६००९९९

७.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी १७२/२०२३ भा.दं.वि कलम ३२४,३२३,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२७/०२/२०२३ रोजी १६/३० वा.सुमा.माउली
कृपा अपार्टमेंट फ्लॅट नं.१०६ बावधन ब्रु/ ता.मुळशी जि.पुणे च्या समोर

गुन्हा दाखल :- दि.०१/०३/२०२३ रोजी १८.०० वा.

फिर्यादी :- पंकज धनराज हंदराळे, वय २१, धंदा -डीलीवरी बॉय, रा-माउलीकृपा अपार्टमेंट फ्लॅट नं.१०६ बावधन ब्रु/ ता.मुळशी जि.पुणे

आरोपी :- १)सिध्दार्थ वाघमारे २)साईराज दगडे ३.रुषीकेश दगडे ४. प्रणव दगडे
सर्व. रा.बावधन ता.मुळशी जि.पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी राहत असलेले गल्लीतील लहाण मुलांची आरोपी क्र १ यांच्या बरोबर भांडणे झाली होती.ते भांडण फिर्यादीने मिटवली याचा राग मनामध्ये धरुन आरोपी क्र १ याने त्याच्या हातातील बांबुने फिर्यादीचे पाठीवर मारहाण केली व यांच्यासोबत आलेल्या आरोपी क्र २ याने फिर्यादीचे डाव्या कानाच्या मागे बांबुने मारहाण केली तसेच त्यानंतर आरोपी क्र ३ याने फिर्यादीचे डाव्या दंडावर व पोटरीवर चाकुने मारहाण करुन जखमी केले तसेच आरोपी क्र ४ याने बांबुने व दगडाने पायावर मारहाण केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि खडके ७७४१९९६३४३

८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ६१/२०२३ भादवि कलम ४०७, ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०१/२०२३ रोजी पासून ते दि. ११/०२/२०२३ रोजी चे दरम्यान मौजे कुरूळी गावचे हद्दीत, शुभम फ्राईड कॅरीअर, इंडिया प्रा.लि. ट्रान्सपोर्ट कंपनी, डोंगरेवस्ती, चिंभळी फाटा, कुरूळी ता. खेड, जि. पुणे, येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/०३/२०२३ रोजी २०.२७ वा |
| फिर्यादी | :- | राकेश नारायण कदम, वय-३६ वर्षे, धंदा- नोकरी, रा. ज्योतीबानगर, विठ्ठल रुख्माई कॉलनी, काळेवाडी, ता. हवेली, जि. पुणे, |
| आरोपी | :- | १) जलालउद्दीन इब्राहिम सय्यद, २) उत्तम गणपत शिनगरे३) मुनीर पुर्णनाव पत्ता माहिती नाही, यांचे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | फिर्यादी हे नमुद कंपनीत सुपरवायझर म्हणून नोकरीस असून यातील आरोपीत हे सदर कंपनी मध्ये गाडी चालक म्हणून कामकरीत आहेत. नमुद तारखेस वेळी व ठिकाणी नमुद आरोपी मजकुर यांनी टाटा मोटर्स प्रा. लि. कंपनी, पिंपरी पुणे येथून गाडी नंबर-एम एच १४ बी जे ३०८४ हिचेवर चालक आरोपी क्र १ याचे ताब्यात विश्वासाने ७५ लोखंडी पॅलेट दिले होते त्या पैकीत्याने ४८,८२५/- रु किं चे ३१ लोखंडी पॅलेटचा आपहार केला आहे. गाडी नंबर- एम एच १४ एफ ६९८३ हिचेवर चालक व मालक आरोपी क्र २ याचे ताब्यात विश्वासाने दिलेले २२ लोखंडी पॅलेट त्या पैकी ०२ लोखंडीपॅलेटा किं ३,१५०/- रु चे आपहार केला. गाडी नंबर- एम एच १४ बी जे ०७५७ हिचे वरील चालक आरोपी क्र ३ याचे ताब्यात विश्वासाने १५ लोखंडी पॅलेट दिले होते त्यानेत्या १५ पॅलेटचा किं २३६२५/- रु चे आपहार केला आहे. असे एकुण ७५,६००/- रु किं चे माल नमुद आरोपी गाडीचालकांचे ताब्यात विश्वासाने दिलेले लोखंडी पॅलेट फिर्यादीचे कंपनीत खाली करणे आवश्यक असताना त्यांनीते कंपनीत खाली केले नाही व त्यांनी सदर मोकळे लोखंडी पॅलेटचा स्वतःचे फायदया करीता आपहार केला आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा बिराजदार ८४५२८५०६८८ |

९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ८४/२०२३भा.दं.वि कलम ४०६,४२०,१२०(ब),४६४,४६५,४६७,४६८,४७१,४४७,५०४,५०६,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०२/१२/२०२० रोजी ते आज तागायत मौजे भारतमाता नगर ,दिघी ता.हवेली,जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | **दि** ०१.०३.२०२३ रोजी ११-५०वा |
| फिर्यादी | :- | प्रणव धोंडीबा वाळके वय ४२ वर्षे धंदा व्यवसाय रा. बी.१/२०३, औरम वाटीका फेज १, दत्तनगर, दिघी गाव पुणे |
| आरोपी | :- | १) राजाराम ऊर्फ राजेंद्र लक्ष्मण ढमाले, २) राजश्री खंडू ढमाले, ३) दिग्विजय राजाराम ढमाले,<br>४) किरण खंडू ढमाले सर्व रा. भोसरी गावठाण पुणे ५)शब्बीर इब्राहीम पटेल रा. स.नं.२१३,सिध्देश्वर शाळेजवळ भोसरी पुणे ६) स्वानंद इनामदार रा. शॉप नं.२१९,दुसरा मजला,पाटील प्लाझा ,पुढारी कार्यालय शेजारी, मित्रमंडळ चौक,सारसबाग पुणे<br>**आरोपी क्र १,३,४,५ अटक आहेत** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी क्र १ ते ४ यांनी फिर्यादीचे मालकीची वडिलोपार्जित मौजे भारतमातानगर दिघी पुणे येथील स.नं. ७६/१ (४ हे.६० आर) व ७६/५ (४२ आर) मधील एकूण ५०२ आर (१२ एकर २२ आर) जमीन त्यांचेकडे कोणताही कायदेशीर अधिकार नसताना अगर त्यांची नावे वर नमूद मिळकतीच्या सातबारा सदरी नोंद नसताना देखील त्यांनी संगनमत करुन आरोपी क्र ५ यांना सरकारी कामांकरिता कुलमुखत्यारपत्र लिहून दिले. आरोपी क्र. ५ यांनी त्याचा बेकायदेशीरपणे वापर करुन स्वतःच्या मेरीलॅंड रिअेलेटर्स व डेव्हलपर्स व आरोपी क्र. ६ यांच्या इनामदार असोसिएटस या कंपनीच्या मालकीच्या असल्याचे दाखवून आरोपी क्र. ५ व ६ यांनी बेकायदेशीरपणे विक्री केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे मौजे भारतमातानगर दिघी पुणे येथील फिर्यादीचे मालकीची स.नं. ७६/४ मध्ये आरोपी क्र.३ व ४ हे आरोपी क्र.५ यांचे गुन्हेगार पार्श्वभूमीच्या बळावर द्वेष बुध्दीने फिर्यादीचे मालकीच्या जागेवर येवून फिर्यादीस वारंवार शिवीगाळ दमदाटी करत आहे व सदर जागेवर त्यांनी अतिक्रमण करुन अनाधिकृत टप-या टाकलेल्या आहेत व |

गाडया पार्कींगचा व्यवसाय देखील सुरु केलेला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि शिखरे ८८५५०४७६९५

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी १२५/२०२३ भा.दं.वि.कलम ४०६,४२०,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.११/१२/२०२० रोजी ते दि. २५/०९ /२०२२ रोजी पर्यंत एचडीएफसी बँक, थॅरमॅक्स चौक, चिंचवड ,पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/०३/२०२३ रोजी १५.३४ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १) लक्ष्मीनारायण बुडाती वय-४४ वर्ष, रा- साहीती श्रेष्ठ, रोड नं.३६,प्लॉट नं.१२२२, ४ था मजला, जुबली हिल्स जवळ,चेक पोस्ट, मेट्रो रेल्वेस्टेशन रोड, हैद्राबाद, तेलंगाना२)सौ.पार्वती बुडाती वय अंदाजे-४० वर्ष रा- सदर३) पुर्णचंदर राव रा-पुर्णनांव पत्ता नाही.४)भास्कर नायडु रा-पुर्णनांव पत्ता नाही<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी साहीती इन्फ्राटेक वेन्चरइंडीया प्रा.लि. हैद्राबाद,तेलंगाना याचे एमडी ओनर आरोपी क्र १ ते ४ यांचे २० एकरामध्ये सरवानी इलाईट प्रोजेक्ट एकुण १० टॉवर असलेला प्री लॉंच केला असता त्यामध्ये फिर्यादी, त्यांचे पती इमाम गालीब व मुलगी आरशिया यांनी दोन फलॅट बुक करुन एकुण ६४,००,०००/-(चौसष्ट लाख रुपये) भरुन दोन फलॅट देतो असे सांगुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांना फलॅट अगर त्यांनी गुंतवलेले पैसे परत न देता त्यांचा विश्वासघात करुन फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गायकवाड ९५५२५८१०० |

११.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड २११/२०२३ भादविक ३७९,४०६,४२० |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | माहे सप्टेंबर २०२२ ते दि. ०१/१२ /२०२२ रोजीपर्यत वेळोवेळी, हाईवलुप लॉजिस्टीक प्रा. लि या कंपनीचे ताथवडे, पिं.चिं. पुणे येथील वेअर हाऊस (हब) |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/०३/२०२३ रोजी २२/५६ वा. |
| फिर्यादी | :- | विक्रांत चंद्रकांत मेवाडा, वय ४७ वर्षे, व्यवसाय सिक्युरीटी हेड, रा. श्री समर्थकृपा को. ऑप हौ. सोसायटी,ए/४०१,स्वामीसमर्थ मठासमोर ,नांदीवली रोड समर्थनगर ,डोंबीवली पुर्व. जि.ठाणे |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | माहे सप्टेंबर २०२२ ते दि. ०१/१२/२०२२ रोजीपर्यत वेळोवेळी, हाईवलुप लॉजिस्टीक प्रा. लि या कंपनीचे ताथवडे, पिं.चिं. पुणे येथील वेअरहाऊस (हब) मधुन, सदर माल वितरण प्रणालीतील कोणत्या तरी टप्प्यातील माल ताब्यात असलेल्या इसमाने किंवा कोणीतरी अज्ञात इसमाने, स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता, मुददाम मोबाईल ऑनलाईन ऑर्डर करुन, नंतर खरेदीदार मिळुन न आल्याने मोबाईल अॅव्हाको कंपनीस परत केले असता, ते अॅव्हाको कंपनीस न मिळाल्याचे सांगुन त्यांचेमार्फत फिर्यादीचे कंपनीकडुन त्या किंमतीचा क्लेम घेतल्याने एकुण रु. ११,१४,८२३/- किंमतीचे एकुण ५७ मोबाईल फोन फिर्यादीचे संमतीशिवाय, लबाडीच्या इराद्याने चोरुन नेले किंवा परस्पर त्यांचा अपहार करुन कंपनीची आर्थीक फसवणुक केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि जाधव ९६५३३०६१५६ |